निवडणूक प्राथम्य
ई-मेलद्वारे

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०१/का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १२ मार्च, २०२०

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय:- ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक मार्च २०२० -
नामनिर्देशनपत्र मागविण्याचा व सादर करण्याचा कालावधी वाढविणेबाबत

संदर्भ -१. राज्य निवडणूक आयोगाने समक्रमांकाच्या दिनांक २४/०२/२०२० आदेशान्वये दिलेला निवडणूक कार्यक्रम
२. सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, दिनांक ११ मार्च २०२०
३. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १२ मार्च २०२० चे पत्र

महोदय,

आयोगाच्या संदर्भ क्र. १ येथील दि.२४ फेब्रुवारी २०२० रोजीच्या आदेशान्वये माहे एप्रिल २०२० ते जून २०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सावत्रिक निवडणुकांसाठी दिलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार दि.०६ मार्च २०२० ते १३ मार्च २०२० हा नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा कालावधी आहे.

संदर्भ क्र.२ येथील सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, दिनांक ११ मार्च २०२० अन्वये, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार सार्वत्रिक किंवा पोटनिवडणूक कार्यक्रमांकरिता नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा शेवटचा दिनांक हा २८ फेब्रुवारी,२०२१ किंवा त्यापूर्वीचा असेल, त्याबाबतीत नामनिर्देशनपत्रासोबत वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यपत्र किंवा पडताळणी समितीकडे अर्ज केला असल्याबाबतचा अन्य कोणताही पुरावा आणि निवडून आल्याच्या दिनांकापासून १२ महिन्यांच्या आत पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील, असे हमीपत्र सादर करण्याची मूभा उमेदवारांना दिली आहे.

सबब, उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता, भारतीय संविधानातील तरतुदी तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम १०-अ अन्वये राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे :-

**संदर्भ क्र. १ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आदेशातील ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूकांसाठी नामनिर्देशनपत्र मागविण्याचा व सादर करण्याचा कालावधी दिनांक १६ मार्च २०२० रोजी सायंकाळी ५.००वा. पर्यंत वाढविण्यात येत असून सुधारीत निवडणूक कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे –**

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| २ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी ) | दिनांक ०६/०३/२०२० (शुक्रवार) ते दिनांक १६/०३/२०२० (सोमवार) वेळ स.११.०० ते सायं.५.०० (दिनांक १४/०३/२०२० चा शनिवार व दिनांक १५/०३/२०२० चा रविवार वगळून) |
| ३ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी ) | दिनांक १७/०३/२०२० (मंगळवार) वेळ स.११.०० वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी ) | दिनांक १९/०३/२०२० ( गुरुवार ) दुपारी ३.०० वा. पर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक १९/०३/२०२० ( गुरुवार) दुपारी ३.०० वा. नंतर |
| ६ | **आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक** | **दिनांक ३१/०३/२०२० ( मंगळवार )** स.७.३० वा. पासून ते सायं.५.३० वा. पर्यंत (गडचिरोली जिल्हयासाठी स.७.३० वा. पासून ते दु.३.०० वा. पर्यंत ) |
| ७ | मतमोजणीचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील) | दिनांक ०१/०४/२०२० (बुधवार) |
| ८ | जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणुकीच्या निकालाची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०७/०४/२०२० (मंगळवार) पर्यंत |

**दिनांक १४/३/२०२० व दिनांक १५/०३/२०२० या सार्वजनिक सुट्टींच्या दिवशी अर्जदारांना नामनिर्देशनपत्र केवळ संगणकप्रणालीमध्ये भरण्याची सोय उपलब्ध असेल.**

याबाबत सर्व संबंधित निवडणूक अधिकारी, व निवडणूक निर्णय अधिकारी यासह सर्व संबंधितांना तात्काळ अवगत करावे. तसेच याबाबत स्थानिक पातळीवर सर्व प्रसार माध्यमांव्दारे व्यापक प्रसिध्दी देण्याची दक्षता घ्यावी.

तसेच **ग्रामपंचायतींचा मुदत समाप्तीचा दिनांक लक्षात घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयांकडून नियम ३७ अन्वये निकाल प्रसिध्दीची** कार्यवाही **करण्याची दक्षता घेण्यात यावी.**

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,
१२/३/२०२०
(अविनाश सणस)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत- अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२